**राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे -४११ ००१

श्री. उत्तम शिवराम कारंडे,
मु.पो.मालदन, ता.पाटण, जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद सातारा. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अधीक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जिल्हा परिषद सातारा.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१५८४/२००९/सातारा** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** भविष्य निर्वाह निधीबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. उत्तम शिवराम कारंडे, यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**स्थळ** : पुणे
**दिनांक** : ३१/ १० /२००९

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे -४११ ००१

श्री. रमेश रामचंद्र इंगवले
२९, जिल्हा परिषद कॉलनी, शाहूपुरी, सातारा. **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सातारा विभाग, सातारा. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
ज्ञानवर्धिनी शिक्षण संस्था, १०-क,
अंबेदरे रोड, शाहूपुरी, सातारा.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१५८५/२००९/सातारा** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** ज्ञानवर्धिनी शिक्षण संस्था, सातारा या संस्थेबाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रमेश रामचंद्र इंगवले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडेलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणेः-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**स्थळ :** पुणे
**दिनांक :** ३१ / १० /२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. किरण प्रेमचंद भंगाळे
३५ आनंदनगर, स्विमिंग टँक समोर,
१२/१, सांगवी, पुणे ४११ ०२७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५८७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. किरण प्रेमचंद भंगाळे<br>३५ आनंदनगर, स्विमिंग टँक समोर,<br>१२/१, सांगवी, पुणे ४११ ०२७<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,<br>विकास योजना विभाग,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.मदन रामचंद्र आढारी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,<br>विकास योजना विभाग,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.अनिरुध्द घन:श्याम पावसकर | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.००२.०८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.०९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०१.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०१.११.२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>कोथरुडच्या जागेचे टीडीआर प्रकरण उघडकीस आल्यानंतर महापालिका प्रशासनाने टीडीआर देण्याच्या प्रक्रिया सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता त्यानुसार त्यापूर्वी सादर करण्यात आलेले सर्व प्रस्तावही नव्या प्रक्रियेतून पुढे नेण्यात आले. त्यामुळे टीडीआर चे भाव वाढले, असे कुठल्या कुठल्या बांधकाम व्यावसायिकांचे म्हणणे होते ? या व टीडीआर अनुषंनगे १७ मुद्दयांची माहिती | |

## विवेचन

टीडीआर मंजुरीच्या नव्या पध्दतीच्या संदर्भात आयुक्त, पुणे महानगरपालिका,पुणे व नगर अभियंता, पुणे महानगरपालिका,पुणे यांच्या पत्रकार परिषदेच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांवरुन विविध स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री. किरण प्रेमचंद भंगाळे यांनी मागितली होती. ती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.भंगाळे यांनी राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीत केले. आपल्या, तसेच संबंधित अन्य विभागांकडील माहिती श्री.भंगाळे यांना देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानरगपालिका, पुणे श्री.अनिरुध्द घन:श्याम पावसकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

मुळात वृत्तपत्रातील बातमीवरुन माहिती मागितली आहे व अनेक मुद्दे संदिग्ध स्वरुपाचे आहेत. हे लक्षात घेता माहिती चुकीची असल्याचे वा ती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानरगपालिका, पुणे यांचा उद्देश दिसत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**पुणे**
**दिनांक : ५ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर** ⑥

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्रीमती सुवर्णा रामचंद्र कांबळे,
सर्व्हे नं.१५४/०२, माजी सैनिक नगर,
(शेठकर कंपाऊंड) येरवडा, पुणे-४११ ००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** समता बालक मंदिर व शिक्षण संस्था,
येरवडा, पुणे -६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** माहिती अधिकारी,
समता बालक मंदिर व शिक्षण संस्था, येरवडा, पुणे -६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०१/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** समता बालक मंदिर व शिक्षण संस्था,
येरवडा, पुणे -६ श्री.बी.सी.कांबळे

**जन माहिती अधिकारी तथा** माहिती अधिकारी,
समता बालक मंदिर व शिक्षण संस्था, येरवडा, पुणे -६ श्री.

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.०८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०३.०९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०१.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** (सन १९९८-९९ ते २००६-०७) समता बालक मंदीर व शिक्षण संस्था येरवडा, पुणे-६ ने शैक्षणिक वर्ष १९९९-२००० मध्ये व पासून निर्माण झालेल्या उपशिक्षक पूर्णवेळ पदास मान्यता घेणेसाठी संबंधितांकडे प्रस्ताव, पत्रव्यवहार केला आहे काय? असल्यास तो प्रस्ताव, पत्र व्यवहाराच्या साक्षांकित प्रती व अनुषंगिक एकूण ४ मुद्दे | |

## विवेचन

दि.२१.१०.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये अपीलकर्त्या गैरहजर असल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

उपशिक्षक मान्यता प्रस्तावाच्या अनुषंगाने अपीलकर्त्या श्रीमती सुवर्णा रामचंद्र कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, समता बालक मंदिर व शिक्षण संस्था, येरवडा, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, समता बालक मंदिर व शिक्षण संस्था, येरवडा, पुणे यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे श्रीमती कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. अपीलकर्त्या सुनावणीला गैरहजर होत्या.

श्रीमती संध्या जाधव यांना सेवामुक्त केल्यानंतरशाळेतील रिक्त पदावर अन्य शिक्षकास समायोजित करण्याचा आदेश पुणे महानगरपालिका, शिक्षण मंडळ प्रमुखांनी दिला. ते शिक्षक त्यांच्या मूळ शाळेत रुजू होण्याचे ठरल्यानंतर श्रीमती कांबळे यांच्या नियुक्तिचा प्रस्ताव शाळेने शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका यांच्याकडे पाठविला होता व श्रीमती कांबळे यांना नियुक्तिचे पत्रही दिले होते. परंतु शाळेच्या तुकड्या कमी झाल्यामुळे या प्रस्तावाला शिक्षण मंडळ प्रमुखांनी मान्यता दिली नाही. याबाबत संस्थेने कोणतीही कारवाई आकस बुध्दीने केलेली नाही, उलट श्रीमती कांबळे यांच्या नियुक्तिसाठी प्रयत्न केले आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सचिव श्री.बी.सी.कांबळे यानी पूरक कागदपत्रांसह केले. तसेच या विषयाबाबत श्रीमती कांबळे यांनी शाळा न्यायाधिकरणाकडे दाखल केलेल्या दाव्याचा निर्णय दि.९.१०.२००९ रोजी होण्याची शक्यता आहे. या व्यतिरिक्त मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी दाखल केलेल्या दाव्याची सुनावणी चालू आहे, असेही त्यांनी नमूद केले.

श्रीमती कांबळे यांना माहिती देण्यात आली आहे व त्यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने संस्थेने प्रयत्न केलयाचे कागदपत्रावरुन दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमोणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ५ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११००१

श्री. पुष्पक दामोदर गायकवाड
मु.पो.तरडगांव, ता.फलटण, जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसील कार्यालय, फलटण, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१६०६/२००९/सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक ३१/७/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक ४/९/२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** दिनांक ३०/३/१९८३ चे वाटप पत्राची नक्कल | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. पुष्पक दामोदर गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणेः-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**स्थळ :** पुणे
**दिनांक :** ३१ / १० /२००९

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१) श्री.रविंद्र कोंडिबा आबनावे
२) श्री.सुरेश द. दौंडकर
३) श्री.राजेंद्र गुलाबराव पठारे
सर्व रा.स्नेहसदन अपार्टमेंट,स.नं.४५-अ,
सोमनाथनगर, वडगावशेरी, पुणे -४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (झोन-२),
पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता (झोन-२),
विकास योजना विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१४ / पुणे |
| २ | सुनावणी तारीख | दि.२७.०८.२००८ |

३.
**उपस्थित**

**अपीलकर्ता-** १) श्री.रविंद्र कोंडिबा आबनावे
२) श्री.सुरेश द. दौंडकर
३) श्री.राजेंद्र गुलाबराव पठारे
सर्व रा.स्नेहसदन अपार्टमेंट,
स.नं.४५-अ, सोमनाथनगर, वडगावशेरी, पुणे -४

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (झोन-२),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.जीवन सोनवणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता (झोन-२),
विकास योजना विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.अनिरुध्द घन:श्याम पावसकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.०९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०६.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** १) दि.२७.०८.२००७ च्या अर्जावर आजपर्यंत काय कारवाई केली व काय कारवाई करणार याचा तपशील २) पालिकेने क्रमांक ४७८ नंबरची नोटीस दि.०५.०९.२००७ रोजी २४ तासांच्या मुदतीची दिली होती. त्यानुसार कारवाई झालेली असेल तर त्याबाबत खुलासा देणेत यावा. ३) सदर इसम कोर्टात जाऊन स्टे आणला तर अनधिकृत बांधकामास जबाबदार अधिकारी कोण त्यांची नावे | |

## विवेचन

आपण रहात असलेल्या गृह निर्माण संस्थेतील बेकायदेशीर बांधकामाबाबत केलेल्या तक्रारअर्जावरील काही माहिती मिळाली. महानगरपालिकेने नोटीस देऊनदेखील बेकायदेशीर स्लॅबचे काम न थांबविता पूर्ण केल्याने पाडून टाकण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता (झोन-२), विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.अनिरुध्द घन:श्याम पावसकर यांनी कळविले. परंतु कार्यवाहीचा संपूर्ण तपशील दिला नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (झोन-२), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.जीवन सोनवणे यांनी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रविंद्र कोंडिबा आबनावे, श्री.सुरेश द. दौंडकर व श्री.राजेंद्र गुलाबराव पठारे यांनी केली.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्यात आली व त्यांच्या मूळ तक्रारीनुसार बेकायदेशीर बांधकामाबाबत कार्यवाही करण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता (झोन-२), विकास योजना विभाग,पुणे महानगरपालिका, पुणे श्री.अनिरुध्द घन:श्याम पावसकर यांनी नमूद केले.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (झोन-२), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. ज्ञानेश्वर मोळक यांनी अपिलाची दखल न घेतल्याबाबतचा खुलासा सादर करावा, तसेच

दिलेली माहिती योग्य असल्याबाबत व संबंधित विषयातील सद्यस्थितीची माहिती देणारा अहवाल विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (झोन-२), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.जीवन सोनवणे यांनी एक आठवड्यात आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु श्री.सोनवणे व श्री.मोळक यांनी त्यानुसार पूर्तता केली नाही. आयोगाच्या स्मरणपत्रानंतर श्री.सोनवणे यांनी दि.०८.१०.२००९ रोजी व श्री.मोळक यांनी दि.१२.१०.२००९ रोजी अहवाल सादर केला. अपीलकर्त्याने प्रथम अपील केले नसल्याचे श्री.मोळक यांनी अहवालात नमूद केले आहे. अहवाल सादर करण्यास झालेल्या दिरंगाईबाबत श्री.सोनवणे व श्री.मोळक यांना समज देण्यात येत असून पुन्हा असा विलंब झाल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, याची समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. : २३ -१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. धनंजय सिद्राम जाधव
इमारत क्र.११, फ्लॅट नं.१३६, लोकमान्य नगर,
नवी पेठ, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोली उपआयुक्त,
मुख्यालय, पुणे शहर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे श्री. एस.जी.सोनवणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

**८. मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पोलीस नोटीस दि.४.१.२००७, पोलीस उपायुक्त, विशेष शाखा यांचे कार्यालय बिल क्र.२९७ दि.२०.२.२००७ वरील १ व २ क्रमांकानुसारचे बिल रू. १६९४६/- हे पगार शाखेमध्ये पाठवणेत आले होते. अद्यापी ते पेंडिग पडलेले आहे, तरी सदर बिल पेंडिग का पडले आहे ? सदर कामात दुर्लक्ष करुन मानसिक ताण निर्माण करणाऱ्या कार्यालयीन लिपिकाविरुध्द कोणती कारवाई करणेत येणार आहे ?

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी सदर कार्यक्रमास अपीलकर्ता उपस्थित नव्हते, त्यामुळे दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळीही अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्ता श्री. धनंजय सिद्राम जाधव यांनी आपले देयक प्रलंबित राहिल्या बद्दल माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, पोलीस उपआयुक्त कार्यालय, पुणे यांनी ती विहित मुदतीत दिली. वेतनश्रेणीतील फरकाचा तपशील त्यांना कळवून देयक दुरुस्त करण्यात आले तसेच फरकाची रक्कम धनादेशाद्वारे त्यांच्या खात्यात जमा करण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री. एस.जी.सोनवणे यांनी संबंधित धनादेशाच्या छायांकित प्रतीसह नमूद केले. श्री. जाधव सध्या ठाणे येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक असून फरकाची रक्कम जमा करण्यात आली असल्याने आपण सुनावणीस येणार नसल्याचे त्यांनी कळविले असल्याचे श्री. सोनावणे यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ०८.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनकर साधू वाघमारे
मु.सांगवी, पो.भोसे, ता.कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव,
तहसील कार्यालय कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव,
तहसील कार्यालय कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिनकर साधू वाघमारे
मु.सांगवी, पो.भोसे, ता.कोरेगाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव,
तहसील कार्यालय कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा सौ.किर्ती नलावडे
**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव,
तहसील कार्यालय कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा सौ.स्मिता पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२१.८.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

जुन्या शर्तीचा रिग्रँट आदेश तहसीलदारांनी केल्यानुसार फेरफार मंजूर झाला, त्या आदेशाची प्रमाणित नक्कल आपण मागितली होती. कायमस्वरुपी जतनाचे हे अभिलेख असूनही आपल्याला ते दिले जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिनकर साधू वाघमारे यांनी केली.

दि.१८.८.१९७५ रोजी तहसीलदार, कोरेगाव यांनी केलेला हा आदेश आहे. नवीन शर्तीचा हुकूम करण्याचे अधिकार त्यांना असले तरी जुन्या शर्तीचा हुकूम करण्याचे अधिकार तहसीलदार, कोरेगाव यांना नव्हते. ते फक्त महाराष्ट्र सरकारला होते व विभागीय आयुक्तांना प्रदान केलेले होते. त्यामुळे तहसीलदारांचा हुकूम व त्या आधारे झालेली फेरफार नोंद बेकायदेशीर आहे, असे श्री.वाघमारे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

संबंधित आदेशाची प्रत श्री.वाघमारे यांना देण्यासंबंधी अभिलेख कक्षाला लेखी कळविण्यात आले होते. परंतु ते उपलब्ध होत नसल्याचे अभिलेख कक्ष लिपिकाने कळविले. श्री.वाघमारे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कोरेगाव यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकारी यांचे उत्तर ग्राह्य मानून ते फेटाळण्यात आले. तसेच संबंधित जमीन सरकारजमा करण्याचा आदेश जिल्हाधिकारी यांनी दिलेला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव सौ.स्मिता पवार यांनी केले.

संबंधित अभिलेख कायमस्वरुपी जतनाचे असून ते उपलब्ध होत नसल्यास जतनाची जबाबदारी असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा खुलासा घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,

२००५ अन्वये त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी व १५ दिवसात आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

सन १९७५ पासून अभिलेख कक्ष, कोरेगाव येथे नाव व पत्ते उपलब्ध असणाऱ्या श्रीमती एस.के.पवार, श्रीमती एस.पी.झणकर व श्रीमती ए.डी.चव्हाण यांचा खुलासा मागविण्यात आला. अभिलेख उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले. दरम्यानच्या काळात श्री.वाघमारे यांनी लोकायुक्तांकडे अर्ज केला होता. फेरफाराची नोंद फेरतपासणीमध्ये घ्यावी, असे आदेश लोकायुक्तांनी उपविभागीय अधिकारी, सातारा यांना दि.५.६.२००८ च्या पत्रान्वये दिले. फेरफार नोंद जुन्या शर्तीऐवजी नवीन शर्तीवर दुरुस्त करण्यात यावी, शर्तभंग झालेला असल्यास नियमानुसार कार्यवाही करावी, असा निकाल उपविभागीय अधिकाऱ्यांनी दि.१५.७.२००८ रोजी दिला. अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी तहसीलदार, कोरेगाव श्रीमती किर्ती नलावडे यांना कार्यवाहीचे आदेश दिले, त्यानुसार संबंधितांना सुनावणीच्या नोटिसा देऊन कामकाज चालविण्यात आले. तथापि श्री.वाघमारे यांच्या विनंतीवरुन अप्पर जिल्हाधिकारी यांनी जैसे थे स्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कोरेगाव यांनी दि.७.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. संदर्भित विषयात श्री.वाघमारे यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने चालू असलेली कार्यवाही व अभिलेख लिपिकांचे खुलासे लक्षात घेता, अन्य कारवाईची आवश्यकता नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

डॉ. रामचंद्र बारकू पचपिंड
मु.पो.देहुगाव, ता.हवेली,
जि.पुणे ४१२ १०९ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय खेड,
ता.खेड, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,
मौजे कुरुळी, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.३०.०४.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय खेड,<br>ता.खेड, जि.पुणे श्री.दिगंबर रौंधळ<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,<br>मौजे कुरुळी, ता.खेड, जि.पुणे श्री.एस. व्ही. शिर्के | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०१.०१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे कुरुळी, ता.खेड, जि.पुणे येथील शेतकरी श्री.गेनू रामा मेदनकर हे दि.०२.०६.१९६६ रोजी मयत झाले असून त्यांचे वारसाचा फेरफार नोंदीचे अर्ज जबाब व नोटीस बुकाची नक्कल, रजिस्टर उतारा (६ क ) इत्यादी. | |

## विवेचन

आयोगाने दि.३०.०४.२००९ रोजी आयोगाने केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये या अपीलाचा समावेश करण्यात आला होता. अर्जदार यांनी दि.१८.१२.२००७ रोजी लेखी जबाब दिला असून अपील निकाली काढणेबाबत लेखी दिले आहे. तसेच अपील निकाली काढावे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्यावेळी प्रपत्रात नमूद केले आहे.

तथापि 'जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मला जी माहिती पाहिजे ती आम्ही अभिलेख कक्षातून शोधून देतो. तेव्हा तुम्ही आज दि.१८.१२.२००७ रोजी जबाब लिहून द्या, असे सांगितले, त्याप्रमाणे जबाब लिहून दिला त्यानंतर अभिलेख शाखेत शोधण्याचे नाटक करुन अभिलेख शाखेत सदरचा अभिलेख आढळून येत नाही. असे म्हटल्यानंतर मी आपणाकडे द्वितीय अपील दाखल केले.' असे अपीलकर्ता डॉ.पचपिंड यांनी दि.१५.०५.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

डॉ.पचपिंड यांच्या उपरोक्त आक्षेपाच्या अनुषंगाने आयोगाने दि.१८.०६.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून खुलासा मागविला. त्यानुसार दि.२६.०६.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, मौजे कुरुळी, ता.खेड, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय खेड,ता.खेड, जि.पुणे यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला डॉ.पचपिंड यांचा दि.१८.१२.२००७ चा लेखी जबाब संगनमताने व जाणूनबुजून माहिती न देण्याच्या दुष्ट हेतूने घेतला हे म्हणणे योग्य नाही, व या आक्षेपाबाबत डॉ.पचपिंड यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना प्रत्यक्ष काहीही, कधीही कळविलेले नाही. तर आयोगाच्या पत्रान्वये श्री.पचपिंड यांचा आक्षेप जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना अवगत झाला, असे खुलाशात म्हटले आहे.

'डॉ.पचपिंड यांना उपलब्ध माहिती देण्यात आली असून माहिती मागणी अर्जातील आर.टी.एस.फाईल व वारस रजिस्टर अभिलेख कक्षात आढळ होत नाही, असा अभिलेखपाल यांनी लेखी खुलासा केला आहे. परंतु तरी देखील अर्जदारास उपयुक्त ठरु शकेल अशी अनुषंगिक व उपलब्ध माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.' असे जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, मौजे कुरुळी, ता.खेड, जि.पुणे व अपिलीय

प्राधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय खेड,ता.खेड, जि.पुणे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी आयोगास सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) डॉ.पचपिंड यांनी मागितलेल्या तथापि आढळ होत नसलेल्या अभिलेखांची वर्गवारी व जतन कालावधीचा तपशील जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, मौजे कुरुळी, ता.खेड, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय खेड,ता.खेड, जि.पुणे यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिसांत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दिनांक : ०८ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.सुधीर काका कुलकर्णी
'सप्तश्रृंग' अपार्टमेंट, सर्व्हे नं.२०/३/६/६,
प्लॉट नं.५, रोहितनगर जवळ, बावधन खुर्द,
पुणे-२१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७०५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री.सुधीर काका कुलकर्णी<br>'सप्तश्रृंग' अपार्टमेंट, सर्व्हे नं.२०/३/६/६,<br>प्लॉट नं.५, रोहितनगर जवळ, बावधन खु.,<br>पुणे-२१<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,<br>विकास योजना विभाग,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,<br>विकास योजना विभाग,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०१.०८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०८.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०१.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.१०.२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>'विकास शुल्का'चा नेमका अर्थ व मनपाचे संकल्पना व्याख्या,त्या विकास शुल्कात नेमक्या कोणकोणत्या गोष्टींचा विकास शुल्काचा अंतर्भाव समावेश होतो, कोणकोणत्या शुल्कांची आकारणी केली जाते, ती माहिती सविस्तरपणे द्यावी. हे विकास शुल्क कोणत्या आधारे, कायद्याने, धोरणाने परिपत्रकाने वसूल कसे काय केले जातात, त्याबाबत कायदा श्रेष्ठ की धोरण, परिपत्रक ते कळवावे. | |

## विवेचन

'विकास शुल्का'चा नेमका अर्थ व मनपाचे संकल्पना व्याख्या इ.बाबींची विस्तृत माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.सुधीर काका कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.कुलकर्णी यांच्या अर्जानुसार मुख्यतः अन्वयार्थाच्या स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ती संकलीत करुन देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिला. त्यानुसार आपल्याला माहिती मिळाली. विकास शुल्काच्या वैधतेबाबत आपल्याला महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा करावयाची आहे, असे प्रतिपादन श्री.कुलकर्णी यांनी केले. मात्र सदर बाब व अन्वयार्थाच्या स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : ५ / १०/२००९**